# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४.

## ।। प्र क ट न ।।

विषय- फेब्रुवारी-मार्च २०२० मध्ये घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन सादर करावयाच्या तारखांबाबत..

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांचेमार्फत फेब्रुवारी-मार्च २०२० मध्ये घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेच्या नियमित, पुनर्परिक्षार्थी, नाव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी, श्रेणी सुधार योजनेअंतर्गत व तुरळक विषय घेऊन परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने **www.mahahsscboard.maharashtra.gov.in** किंवा **www.mahahsscboard.in** या संकेतस्थळावर भरावयाची असून त्यांच्या तारखा व तपशील खालीलप्रमाणे -

| शुल्क प्रकार | उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांमार्फत शास्त्र, कला व वाणिज्य शाखांची फक्त नियमित विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे SARAL Database वरुन ऑनलाईन पध्दतीने भरावयाच्या तारखा | उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांमार्फत व्यवसाय अभ्यासक्रम शाखेचे नियमित विद्यार्थी (Hsc Vocational Stream) पुनर्परिक्षार्थी, यापूर्वी नाव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी, श्रेणी सुधार योजनेअंतर्गत व तुरळक विषय घेऊन परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे प्रचलित पध्दतीप्रमाणे ऑनलाईन पध्दतीने भरावयाच्या तारखा | उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांनी चलन Download करुन बँकेत चलनाद्वारे शुल्क भरावयाच्या तारखा |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| अ) नियमित शुल्कासह → | गुरुवार दि. ०३/१०/२०१९ ते बुधवार दि. २३/१०/२०१९ | गुरुवार दि. २४/१०/२०१९ ते गुरुवार दि. ३१/१०/२०१९ | शुक्रवार दि. ०१/११/२०१९ ते सोमवार दि. १८/११/२०१९ |
| ब) विलंब शुल्कासह → | शुक्रवार दि. ०१/११/२०१९ ते शुक्रवार दि. ०८/११/२०१९ (सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत) | | |

अ) उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांनी विभागीय मंडळाकडे शुल्क भरल्याच्या चलनासह विद्यार्थ्यांच्या याद्या व Pre-list जमा करावयाची तारीख = मंगळवार दि. १९/११/२०१९

ब) आवेदनपत्रे भरावयाच्या कालावधीमध्ये उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांनी Pre-list Print करुन विद्यार्थ्यांमार्फत आवेदनपत्रातील सर्व माहिती अचूक असल्याची खात्री करावी व विद्यार्थ्यांची स्वाक्षरी घ्यावी. त्यानंतर सदर Pre-list चलनासोबत विभागीय मंडळात जमा करावी.

इ.१२वी परीक्षेची आवेदनपत्रे ही ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने विद्यार्थ्यांनी आवेदनपत्रे त्यांच्या उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांमार्फत भरावी. सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्य यांनी ऑनलाईन आवेदनपत्रे भरण्यासाठी खालील महत्वाच्या बाबी विचारात घेणे आवश्यक आहे.

१. शासन आदेशानुसार उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी नियमित विद्यार्थ्यांची शास्त्र, कला व वाणिज्य शाखांची ऑनलाईन आवेदनपत्रे स्विकारण्यासाठी Saral Database मध्ये विद्यार्थ्यांची नोंद आवश्यक आहे. व सदर Saral Data वरुनच नियमित विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे भरावयाची आहेत.

२. व्यवसाय अभ्यासक्रम (Hsc Vocational Stream) शाखेच्या नियमित विद्यार्थ्यांची, पुनर्परिक्षार्थी, यापूर्वी नाव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी, श्रेणी सुधार व तुरळक विषय घेऊन परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांची माहिती Saral Data मध्ये नसल्याने सदर विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे प्रचलित पध्दतीने ऑनलाईनच भरावयाची आहेत. त्यांच्या तारखा वरीलप्रमाणे (कॉलम नं.३ नुसार) निश्चित करण्यात आल्या आहेत.

३. शासन निर्णयानुसार दुष्काळ/टंचाईग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या इ.१०वी व इ.१२वी च्या परीक्षा फीची प्रतिपूर्ती/माफी करण्यासाठी आवेदनपत्रामधून विद्यार्थ्यांचे महसूल मंडळ, गाव, तालुका व जिल्ह्याची तसेच विद्यार्थ्यांचे/पालकांचे बँक खात्याची माहिती मंडळाने जमा करणेबाबत शासनाने आदेश आहेत. सबब त्यानुसार विद्यार्थ्यांची माहिती सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी मंडळाकडे माहिती सादर करावी.

४. सर्व विभागीय मंडळातील उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी प्रचलित शुल्क मंडळाने निश्चित केलेल्या बँकेच्या खात्यामध्ये जमा करुन चलनाची प्रत व विद्यार्थ्यांच्या याद्या दिलेल्या मुदतीतच संबंधित विभागीय मंडळाकडे सादर करावयाच्या आहेत.

५. नियमित शुल्कासह तसेच विलंब शुल्कासह आवेदनपत्रे सादर केलेल्या विद्यार्थ्यांचे शुल्क दोन स्वतंत्र चलनाद्वारेच भरण्यात यावे.

दिनांक ३०/०९/२०१९

(डॉ.अशोक भोसले)
सचिव
राज्यमंडळ, पुणे-०४

---

क्र.पुविमं/शाखा अ/उ मा/ 5248
पुणे-४११ ००५.
दि.०१/१०/२०१९

प्रति,

प्राचार्य ,

सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालये, (जिल्हे - पुणे, अहमदनगर, सोलापूर).

उपरोक्त राज्यमंडळाच्या परिपत्रकाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात यावी. सदर माहिती सर्व कनिष्ठ महाविद्यालयांनी आपल्या सूचना फलकावर लावून विद्यार्थी व पालक यांच्या निदर्शनास आणून द्यावी.

3/10/19

विभागीय सचिव ,
पुणे विभागीय मंडळ,
पुणे-४११ ००५.